।। श्रीकृष्णाय नमः ।।

हिंदु धर्माची थोरवी सांगणारी ग्रंथमालिका : खंड ५

# गीताज्ञानदर्शन

मराठी (Marathi)


**अभ्यासक**

**अनंत बाळाजी आठवले,** बी.ई. (सिव्हिल)



## सनातन संस्था



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४४, इंग्रजी २०१, कन्नड १९८, हिंदी १९५, गुजराती ६८, तेलुगु ४५, तमिळ ४३, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**मार्च २०२४ पर्यंत ३६५ ग्रंथांच्या १३ भाषांत ९६ लाख ३१ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

।। श्रीकृष्णाय नमः ।।

# अभ्यासक अनंत बाळाजी आठवले यांचा परिचय



## बालपणापासूनच ईश्वर व ब्रह्म यांविषयी जिज्ञासा !

'स्थापत्य अभियंता (बी.ई. [सिव्हिल]) असलेले पू. अनंत बाळाजी आठवले (पू. भाऊकाका) हे सेवानिवृत्तीपूर्वी मध्यप्रदेशातील 'मध्यप्रदेश लघु उद्योग निगम' या शासकीय संस्थेत 'प्रभारी मुख्य महाप्रबंधक' होते. लहानपणीच 'दासबोध' आणि शालेय जीवनात 'श्रीमद्भगवद्गीता' या ग्रंथांशी परिचित होऊन पू. भाऊकाका यांच्यात ईश्वर अन् ब्रह्म यांना जाणण्याची तीव्र इच्छा जागृत झाली.

## 'अभियांत्रिकी' हे केवळ उपजीविकेचे साधन मानणे आणि 'ब्रह्मज्ञान' हे जीवनाचे ध्येय असणे

पू. भाऊकाका हे अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत होते, तेव्हापासून 'अभियंता होणे, हे केवळ उपजीविकेचे साधन आहे आणि 'ब्रह्मज्ञान मिळवणे', हे जीवनाचे ध्येय आहे', असा त्यांचा दृष्टीकोन होता. अभियंता झाल्यानंतर संपूर्ण सेवा काळातही तोच दृष्टीकोन राहिला. त्यामुळे वेळ मिळेल, तेव्हा तत्त्वज्ञानाचे ग्रंथ ते वाचत असत. तत्त्वज्ञानावरील आधुनिक विद्वानांचे ग्रंथ वाचण्यापेक्षा मूळ संस्कृत ग्रंथ वाचण्याकडेच त्यांचा सदैव कल राहिला. संस्कृत भाषा चांगली समजत असल्याने 'योगवासिष्ठ' सारखे काही ग्रंथ भाषांतराविना किंवा केवळ संस्कृतमध्ये टीकेसह उपलब्ध होऊनही ते त्यांना अभ्यासता आले.

## तत्त्वज्ञानावरील ग्रंथांचा अभ्यास

सेवानिवृत्त झाल्यानंतर ब्रह्मजिज्ञासेमुळे इतर सर्व आवडीच्या विषयांना पूर्णविराम देऊन त्यांनी तत्त्वज्ञानावरील विवेकचूडामणि, श्रीमद्भगवद्गीता, उपनिषदे, नारदभक्तिसूत्र, ब्रह्मसूत्र, पातञ्जलयोगदर्शन, पंचदशी, भागवतपुराण, एकनाथी भागवत, ज्ञानेश्वरी, दासबोध आदी अनेक ग्रंथांचा सखोल अभ्यास केला आणि अजूनही अध्ययनरत आहेत.

## सनातनच्या १०१ व्या संतपदी विराजमान !

पू. भाऊकाका ज्ञानयोगानुसार साधना करतांना २७.६.२०१९ या दिवशी सनातनच्या १०१ व्या संतपदी विराजमान झाल्याचे ‘सनातन संस्थे’च्या वतीने घोषित करण्यात आले आणि त्यांचा सन्मान करण्यात आला.

## वयाच्या ८६ व्या वर्षीही सेवारत असणे


पू. भाऊकाका वर्ष २००९ पासून सनातनच्या संकेतस्थळासाठी मराठी भाषेतील लेखांचा हिंदी भाषेत अनुवाद करत आहेत. ते आज वयाच्या ८६ व्या वर्षीही विविध शब्दकोश आणि संदर्भग्रंथ यांचा अभ्यास करून भाषांतर परिपूर्ण करत आहेत. त्यांचे मराठी भाषेसह हिंदी भाषेवरही प्रभुत्व आहे. ते त्यांचे लेख मराठी भाषेत लिहीत असतांना हिंदी भाषेतही लिहितात. त्यामुळे त्यांचा हिंदी भाषेतील ग्रंथही लवकर प्रसिद्ध होईल.’ F (SStAnA-Pari)

**– प्रकाशक (१२.११.२०२१)**

**।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।**



## पू. अनंत आठवले यांचे चरित्र : खंड २

## पू. अनंत आठवले यांना ‘संत’ घोषित केल्याचा सोहळा



- पू. अनंत आठवले संतपदी विराजमान झाल्यावर सनातनच्या साधिकेने केलेले सूक्ष्म परीक्षण
- पू. अनंत आठवले यांनी परात्पर गुरु डॉ. आठवले यांच्या लहानपणीच्या सांगितलेल्या हृद्य आठवणी !
- सनातन प्रकाशित करत असलेल्या लिखाणाविषयीचे पू. अनंत आठवले यांचे विचार
- भारताच्या श्रेष्ठत्वाविषयीचे पू. अनंत आठवले यांचे विचार

# सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. धर्माधिष्ठित अशा हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष आणि कार्यारंभ (वर्ष १९९८)

३. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २०.३.२०२४ पर्यंत १२७ साधक संत झाले, तर १,०५३ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू.

४. देवता, साधना, आचारधर्मपालन, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

५. शारीरिक, मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

६. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

७. चित्रकला, संगीत, नृत्य आदींच्या सात्त्विक सादरीकरणाविषयी संशोधन

८. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

९. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

१०. भीषण आपत्काळ आधीच ओळखून त्या काळात जीवितरक्षणासाठी उपयुक्त ठरणारे मार्गदर्शन आणि ग्रंथ

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

# अनुक्रमणिका


卐 प्रस्तावना ९

卐 श्रीमद्भगवद्गीता हिंसा नाही, तर मोक्षप्राप्तीचे मार्ग सांगते, हे रशियाला समजवा ! १४

卐 'गीताज्ञानदर्शन' – गीतेचा भावार्थ समजावून सांगणारा एक अद्वितीय ग्रंथ !' १८

卐 गीतेतील शिकवण आचरणात आणून स्वत:तील ईश्वरत्व जागवा ! २०

卐 प्रकरण १ : गीताअध्याय २१

अध्याय १ – अर्जुनविषादयोग २१

अध्याय २ – सांख्ययोग २४

अध्याय ३ – कर्मयोग ३६

अध्याय ४ – ज्ञानकर्मसंन्यासयोग ४१

अध्याय ५ – कर्मसंन्यासयोग ४८

अध्याय ६ – आत्मसंयमयोग (ध्यानयोग) ५६

अध्याय ७ – ज्ञानविज्ञानयोग ६०

अध्याय ८ – अक्षरब्रह्मयोग ६४

अध्याय ९ – राजविद्याराजगुह्ययोग ६८

अध्याय १० – विभूतीयोग ७२

अध्याय ११ – विश्‍वरूपदर्शनयोग ७५

अध्याय १२ – भक्तियोग ७८

अध्याय १३ – क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग ८१

अध्याय १४ – गुणत्रयविभागयोग ८४

अध्याय १५ – पुरुषोत्तमयोग ८७

अध्याय १६ – दैवासुरसंपद्विभागयोग ९०

अध्याय १७ – श्रद्धात्रयविभागयोग ९२

अध्याय १८ – मोक्षसंन्यासयोग ९६

卐 उपसंहार १०४

**परिशिष्ट १ – काही उद्‌बोधक विचार १०५**

१. हिंदु २. अहंकार १०५

३. मनुष्यांचे स्वभाव आणि आवडीनिवडी वेगवेगळ्या का असतात ? १०६

४. गुणकर्मविभाग ५. कामना १०६

६. कर्मांनी ज्ञान कसे प्राप्त होते ? १०८

७. राक्षसी, आसुरी आणि मोहिनी प्रकृती १११

८. योगक्षेम ९. वाद ११२

१०. कार्य आणि करण ११. आत्मा, ईश्वर, परमात्मा आणि ब्रह्म ११२

१२. मुक्तीसाठी भक्ती १३. स्फुट विचार ११७

**परिशिष्ट २ – गीतेतील बहुतेक सर्व अध्यायांत समत्व आणि निष्कामता या दोन गोष्टी समान असणे १२६**

**परिशिष्ट ३ – श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या प्रत्येक अध्यायातील साधनेचे सार १२८**

**परिशिष्ट ४ – भक्ताला आश्वस्त करणारी श्रीकृष्णांची काही वचने १३१**

**परिशिष्ट ५ – भगवद्‌गीतेतील काही अमूल्य रत्ने १३३**

रत्न १ : योगांची अगदी थोडक्यात ओळख १३३

रत्न २ : कर्मयोग, हा कर्म सुटण्यासाठी असणे १३३

रत्न ३ : सात्त्विक, राजसी आणि तामसी ज्ञान १३४

रत्न ४ : तपश्चर्या १३६

रत्न ५ : आपल्या स्वाभाविक कर्मांनीही ईश्वरप्राप्ती शक्य १३८

रत्न ६ : विभिन्न साधना आणि साधनांची मूळ मेख १३९

रत्न ७ : ‘निर्गुण’, ‘निर्गुणत्व’ असे काहीही नसणे १४०

**परिशिष्ट ६ – वाचकांचे काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे** १४१

प्रश्न १ : वर्ण स्वभावानुसार मानावा की जन्मानुसार? १४१

प्रश्न २ : जीवाला आधीच्या जन्माच्या आठवणी का राहत नाहीत? १४६

प्रश्न ३ : त्रिगुणांचा वापर करावा. त्रिगुणांना त्याज्य का मानावे? १४७

प्रश्न ४ : ईश्वरच सर्व करतो की नाही ? १४९

प्रश्न ५ : कर्मकांड, कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तीयोग ह्यांच्यातील अंतर काय आहे ? १५१

**परिशिष्ट ७ – ग्रंथकाराचे विशेष लेख** १५७

लेख १ : ईश्वर स्वसंवेद्य आहे ! १५७

लेख २ : मनुष्याला आत्मसाक्षात्कार (स्वरूपाचा बोध) स्वतःत कुठे आणि कसा होतो ? १५९

लेख ३ : धर्म – लेखाचा उद्देश आणि मर्यादा १६१

**परिशिष्ट ८ – सनातन धर्म : काही अपसमज आणि त्यांविषयीची सत्यस्थिती** १७०

**卐 प्रकरण २ : 'ज्ञानाचे भांडार', तसेच अनेक गुणांची खाण असलेले पू. भाऊकाका (पू. अनंत आठवले) !** १८४

**卐 प्रकरण ३ : प्रस्तुत ग्रंथाविषयी सनातनचे संत आणि साधक यांनी काढलेले उद्‌गार** १८८

**卐 प्रकरण ४ : ग्रंथाविषयी सनातनच्या साधकांना आलेल्या अनुभूती** १९२

**卐 प्रकरण ५ : ती. भाऊकाका यांनी ६४ टक्के आध्यात्मिक पातळी गाठल्याविषयी दिलेले शुभेच्छापत्र** १९४

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** १९६

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** २००

---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

# प्रस्तावना

।। श्रीकृष्णाय नमः ।।

## साधनापथावरून चालणाऱ्यांना मोक्षाचा मार्ग दाखवणारी 'भगवान् श्रीकृष्णांची शिकवण' !

'भगवान् श्रीकृष्ण ! नाव घेताच मन आदराने आणि आनंदाने भरून जाते. श्रीकृष्णांविषयी अत्यधिक आदर का वाटतो ? त्यांच्या अप्रतिम सौंदर्यामुळे ? रासलीलेमुळे ? बालपणापासून त्यांनी केलेल्या अनेक चमत्कारांमुळे ? सर्वज्ञतेमुळे ? विष्णूच्या सोळा कलांचा पूर्णावतार असल्यामुळे ? नाही, तर भगवद्गीतेत त्यांनी सांगितलेल्या दिव्य ज्ञानामुळे ! वस्तुतः त्या ज्ञानासाठी 'दिव्य', 'अप्रतिम', 'अलौकिक' हे शब्दही थिटे पडतात.

## १. शब्दांना मर्यादा असूनही विलक्षण शब्दरचनेतून भगवान् श्रीकृष्णांनी अनिर्वचनीय आत्मा, ईश्वर, ब्रह्मादी अनेक विषय सुस्पष्ट अन् सुंदररित्या समजावून सांगणे

केवळ ७०० श्लोकांची भगवद्गीता आणि त्यातील ५७४ श्लोक श्रीकृष्णांचे. खरेतर शब्दांनी व्यक्त करण्याची क्षमता सीमित असते. अगदी नेहमीच्या व्यवहारातल्या आणि अनुभवातल्या गोष्टीही आपण शब्दांनी व्यक्त करू शकत नाही, उदाहरणार्थ गुळाची चव कशी ? तर गोड. सीताफळ गोड, केळे गोड, फणस गोड. मग गूळ चवीला सीताफळासारखा लागतो का ? केळे फणसासारखे लागते का ? या प्रत्येकाच्या चवीतील वेगळेपण आपण शब्दांनी सांगू शकत नाही. ती केवळ अनुभवण्याची गोष्ट आहे, अनुभवगम्य आहे. तसेच ईश्वर, ब्रह्म हे अनिर्वचनीय आहेत. केवळ अनुभवगम्य आहेत.

तरीही श्रीकृष्ण ते श्रीकृष्णच ! त्यांनी इतक्या थोड्या श्लोकांमध्ये

विलक्षण शब्दरचनेतून आत्मा, ईश्वर, ब्रह्म, जन्म-मृत्यू-पुनर्जन्माचे रहस्य, देवतांचे पूजन आणि त्याचे फळ, त्रिगुण अन् जीवनातील प्रत्येक अंगाचे गुणांनुसार भेद, जन्म-मरणाच्या चक्रांत अडकण्याचे कारण आणि त्यातून सुटण्यासाठी अनेक योगमार्ग (साधनामार्ग), पराभक्ती इत्यादी अनेक विषय इतके स्पष्ट करून सांगितले आहेत की, एकही संदेह राहत नाही. कर्मे करूनही त्यांचे पाप-पुण्य लागू न देण्याच्या त्यांनी सांगितलेल्या युक्तीला तर तोडच नाही.

## २. गीतेवरील लिखाणाची ग्रंथनिर्मिती करण्यामागील प्रयोजन आणि निर्मितीचा प्रवास

**२ अ. प्रस्तुत ग्रंथात तत्त्वज्ञान, साधना आणि तिचे फळ असे अध्यायानुसार वर्गीकरण केलेले असणे :** गीतेविषयी एक उक्ती आहे, ‘गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः ।’ (श्रीमद्भगवद्गीतामाहात्म्य, श्लोक ४), म्हणजे ‘गीतेचा अर्थ समजून घेऊन त्यात सांगितल्यानुसार वागावे. मग शास्त्रांवरच्या इतर ग्रंथांशी काय देणे-घेणे?’ इतके गीतेचे महत्त्व आहे.

गीतेवर थोर विद्वानांचे अनेक ग्रंथ आहेत; पण प्रत्येक अध्यायातील तत्त्वज्ञान, साधना आणि तिचे फळ असे वर्गीकरण करणारा ग्रंथ पाहण्यात आला नाही. ते करून आवश्यक तेथे विषय स्पष्ट करणारे विवेचनही या ग्रंथात जोडले आहे. काही विशेष विषय परिशिष्ट १ मध्ये स्पष्ट केले आहेत.

(माझी व्यक्तीगत अनुभूती असल्यामुळे सूत्र २ आ, २ इ व २ ई ह्या प्रस्तावनेत लिहावेत, अशी माझी इच्छा नव्हती, तसेच ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय ‘भगवान् श्रीकृष्णांची शिकवण’ हा आहे. त्यात माझा ‘मी’पणा नको; पण परात्पर गुरु डॉ. आठवले यांचा दृष्टीकोन वेगळा आहे. ते ‘प्रत्येक घटनेतून इतरांना काय शिकता येईल’, याचा विचार करतात; म्हणून त्यांनी लिहिण्यास सांगितले.)

**२ आ. वर्ष २००३ मध्ये अध्याय २ ते ९ वर टिप्पण्या लिहिणे आणि गीतेतील ज्ञान समजणे कठीण असल्याच्या निर्णयाप्रत पोहोचून टिप्पण्या काढणे थांबवणे :** मी गीता अनेक वेळा वाचली होती; पण गीतेतील वेगवेगळ्या अध्यायांत सांगितलेले तत्त्वज्ञान आणि साधना यांच्यातील वेगवेगळेपणा काही ठिकाणी स्पष्ट होत नव्हता; म्हणून स्वतःला नीट समजण्यासाठी मी टिप्पण्या (Notes) काढू लागलो. साधारण वर्ष २००३ मध्ये अध्याय २ ते ९ वर टिप्पण्या लिहिल्या. त्या वेळी ग्रंथ लिहिण्याचा विचार मनात नव्हता. नंतर 'गीतेतील ज्ञान समजणे माझ्या बुद्धीमत्तेच्या पलीकडचे आहे', अशा निर्णयापर्यंत पोहोचून मी टिप्पण्या काढणे थांबवले.

**२ इ. टिप्पण्या पूर्ण न झाल्याची टोचणी मनाला लागून उर्वरित अध्यायांवर टिप्पण्या काढणे चालू करणे आणि नोव्हेंबर २०१३ मध्ये त्यांना अंतिम स्वरूप देता येणे :** नंतर गीता वाचणे चालूच राहिले; पण टिप्पण्या पूर्ण न झाल्याची टोचणी मनाला सतत राहिली होती. शेवटी मनाची अस्वस्थता इतकी वाढली की, जून २०१३ पासून आधीच्या टिप्पण्यांचे पुनरीक्षण आणि उरलेल्या अध्यायांवर टिप्पण्या काढणे चालू केले. नंतर 'ज्ञान तर पूर्ण आले पाहिजे; पण शक्यतो न्यूनतम पृष्ठांत व्यक्त झाले पाहिजे', या दृष्टीकोनातून पुन्हा पुनरीक्षण करून अध्यायांवरच्या टिप्पण्यांना नोव्हेंबर २०१३ च्या दिवाळीपर्यंत अंतिम स्वरूप दिले.

**२ ई. श्रीकृष्णांच्या वचनांची घेतलेली प्रत्यक्षानुभूती ! :** हे सर्व करत असतांना प्रत्येक दिवशी, अगदी प्रत्येक दिवशी 'हे सर्व थांबवावे, हे काम माझ्या बौद्धिक आणि आता शारीरिक, आवाक्याबाहेरचे आहे', असे सतत वाटत राहिले अन् एकीकडे अनिच्छेने काम होतही राहिले. भगवान् श्रीकृष्णांनी म्हटले आहे, 'मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ।' (श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय १८, श्लोक ५९), म्हणजे 'मी हे करणार नाही', हा तुझा निश्चय व्यर्थ आहे. तुझा स्वभाव तुला ते करायला

लावील.' भगवान् श्रीकृष्ण पुढे सांगतात, 'मी हे करू नये', असे जे मोहामुळे (अज्ञानामुळे) इच्छितोस, ते तुझ्या स्वभावजन्य कर्मामुळे विवश होऊन करशील. (अध्याय १८, श्लोक ६०)' श्रीकृष्णांच्या या कथनांची मला प्रत्यक्ष अनुभूती आली.

## ३. काही शब्द योजण्याचा प्रघात

अध्यात्मशास्त्रीय ग्रंथांमध्ये आत्मा, पुरुष, परमात्मा, ईश्वर, ब्रह्म हे शब्द भेद न बाळगता एकमेकांसाठी योजले जातात. कुठे काय अर्थ घ्यायचा, हे अनुभवाने किंवा आद्य शंकराचार्य, ज्ञानेश्वर यांच्यासारख्या महात्म्यांनी श्लोकांच्या सांगितलेल्या अर्थाने समजते. याच प्रकारे गीतेच्या दुसऱ्या अध्यायात 'बुद्धियोग' हा शब्द कर्मयोगासाठी, तर दहाव्या अध्यायाच्या दहाव्या श्लोकात 'आत्मज्ञान' या अर्थाने योजला गेला आहे. 'स्वरूप' म्हणजे स्वतःचे रूप; पण ग्रंथांमध्ये 'स्वरूप' हा शब्द 'रूप' या अर्थाने योजण्याचा आणि स्वतःच्या रूपासाठी 'स्वस्वरूप' शब्द योजण्याचा प्रघात पडला आहे.

ग्रंथात काही ठिकाणी संख्या लिहिल्या आहेत. त्या अनुक्रमे गीतेतील अध्याय आणि श्लोक यांच्या संख्या आहेत.

## ४. श्रीकृष्णांच्या उपदेशाचा सारांश !

**४ अ. मुक्त व्हा, म्हणजे मुक्त व्हाल ! :** कामना, ममता आणि अहंकार यांपासून **मुक्त व्हा, म्हणजे** आत्मज्ञान होऊन जन्म-मरणाच्या फेऱ्यांतून **मुक्त व्हाल.**

## ५. कृतज्ञता

**५ अ. परात्पर गुरु डॉ. जयंत बाळाजी आठवले या थोर विभूतीने 'गीतेवरील हे लिखाण ग्रंथरूपाने छापणार', असे सांगितल्याबद्दल त्यांच्याप्रती कृतज्ञता ! :** गीतेत सांगितलेल्या कर्मयोग, ध्यानयोग,

ज्ञानयोग, भक्तीयोग इत्यादी साधना करून आधी चित्तशुद्धी होते आणि नंतर मोक्षाची प्राप्ती सुलभ होते. तीच चित्तशुद्धी सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ. जयंत बाळाजी आठवले 'स्वभावदोष निर्मूलना'च्या प्रक्रियेद्वारा साधकांची करून घेऊन त्यांना मुक्ती सुगम करून देत आहेत. अशा थोर विभूतीने माझे गीतेवरील लिखाण 'ग्रंथरूपाने छापणार' असे सांगितल्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे.

**५ आ. रामसुखदासजी महाराज यांचा ऋणी आहे ! :** ब्रह्मलीन स्वामी रामसुखदासजी महाराजांच्या लिखाणातून तत्त्वज्ञानातील अनेक विषयांवर मला सुस्पष्ट दृष्टीकोन मिळाला. मी त्यांचा ऋणी आहे.

**५ इ. समर्थ रामदासस्वामींसमोर आणि भगवान् श्रीकृष्णांसमोर कृतज्ञतेने नतमस्तक ! :** माझ्या किशोरावस्थेपासूनच ज्यांचे बोट धरून मी आत्मज्ञानप्राप्तीच्या मार्गावर चाललो, ते समर्थ रामदासस्वामी; आणि किशोरावस्थेतच ज्यांनी माझा हात धरला तो आजपावेतो सोडला नाही आणि गीतेचे ज्ञान दिले ते भगवान् श्रीकृष्ण, यांच्यासमोर मी कृतज्ञतेने नतमस्तक आहे.'

**।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।**

**– अभ्यासक** (अनंत बाळाजी आठवले, २१.१२.२०१३) F (PR 1FG-Bh) (१ ते ५ इ)

## परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांच्या 'सच्चिदानंद परब्रह्म' या उपाधीविषयी विवेचन !

१३.७.२०२२ पासून 'सप्तर्षी जीवनाडीपट्टी'च्या वाचनाच्या माध्यमातून सप्तर्षींनी आज्ञा केल्याप्रमाणे परात्पर गुरु डॉ. आठवले यांना 'सच्चिदानंद परब्रह्म' ही उपाधी लावण्यात येत आहे. त्यापूर्वी त्यांना ग्रंथांमध्ये 'प.पू.' आणि 'परात्पर गुरु' या उपाध्यांनी संबोधले आहे. यानुसार ग्रंथात तसा तसा उल्लेख केला आहे.

## श्रीमद्भगवद्गीता हिंसा नाही, तर मोक्षप्राप्तीचे मार्ग सांगते, हे रशियाला समजवा !

‘गीता हिंसेला प्रोत्साहन देते’, अशा कल्पनेने रशियामध्ये भगवद्गीता प्रतिबंधित करण्याचे दोनदा प्रयत्न झाले; पण खरेतर गीता हिंसेला प्रोत्साहन देतच नाही. ती तत्त्वज्ञान शिकवते. हे पुढील सूत्रांवरून स्पष्ट होईल.

### १. अटळ असलेल्या युद्धाला प्रोत्साहन देण्याचा प्रश्नच नसणे

श्रीकृष्ण सर्वज्ञ आणि ईश्वर असल्याने त्यांनी भगवद्गीतेत ‘हे युद्ध होणार आणि त्यात कौरव अन् पांडव यांच्याकडील अनेक मुख्य योद्धे मारले जाणार’, हे युद्धापूर्वीच सांगितले आहे. जे अटळ आहे, त्याला प्रोत्साहन देण्याचा किंवा थांबवण्याचा प्रश्नच कुठे येतो ?

### २. ‘श्रीकृष्णांच्या सांगण्यामुळे अर्जुन लढला’, ही चुकीची कल्पना !

युद्धाला कचरणाऱ्या अर्जुनाला श्रीकृष्णांनी ‘अन्यायाविरुद्ध युद्ध करणे’ हे कर्तव्य असल्याची जाणीव करून दिली. त्या सर्वज्ञ श्रीकृष्णांना ठाऊक होते की, अर्जुन लढणार आहेच ! गीतेतील शेवटच्या, अठराव्या अध्यायातील ५९ व्या श्लोकात हे स्पष्ट सांगितले आहे. श्रीकृष्ण म्हणतात, ‘मी लढणार नाही’, असा विचार करत असशील, तर ते व्यर्थ आहे. तुझा क्षत्रिय स्वभाव तुला ते करायला लावील.’ त्यामुळे ‘श्रीकृष्णांच्या सांगण्यामुळे अर्जुन लढला’, ही कल्पनाच चुकीची आहे.

### ३. युद्ध दोन पक्षांमध्ये होते. केवळ एका पक्षाने युद्ध न करण्याचे ठरवून युद्ध थांबत नाही.

## ४. युद्धाचे निर्णयाधिकार नसलेल्या अर्जुनालाच श्रीकृष्णांनी गीतोपदेश केलेला असणे

युद्ध करण्याचा किंवा न करण्याचा निर्णय राजाचा असतो. आवश्यक वाटले, तर तो सेनापतीचेही मत विचारून घेतो. युधिष्ठिर हा पांडवांचा राजा, तर धृष्टद्युम्न सेनापती होता. अर्जुन सैन्याच्या केवळ एका तुकडीचा प्रमुख होता. युद्धाच्या निर्णयाचा अधिकार त्याला नव्हता आणि श्रीकृष्णांनी गीतोपदेश केवळ अर्जुनाला केला होता.

## ५. गीतेमध्ये अहिंसेलाच प्रतिष्ठित केलेले असणे

अ. 'प्राणीमात्रांमध्ये अहिंसा हा भाव ईश्वरापासून आलेला आहे', असे म्हटले आहे. (श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय १०, श्लोक ५)

आ. अहिंसेला 'ज्ञान', तर तिच्या विपरीत असलेल्या हिंसेला 'अज्ञान' म्हटले आहे. (श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय १३, श्लोक ७)

इ. दैवी आणि आसुरी संपत्ती स्पष्ट करतांना अहिंसा ही दैवी संपत्ती असल्याचे म्हटले आहे. (श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय १६, श्लोक २)

ई. 'मी या शत्रूला मारले, दुसऱ्या शत्रूंनाही मारीन', असा विचार आसुरी असल्याचे म्हटले आहे. (श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय १६, श्लोक १४)

उ. अहिंसा हे शारीरिक तप असल्याचे सांगितले आहे. (श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय १७, श्लोक १४)

ऊ. हिंसेला तामसी कर्म म्हटले आहे. (श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय १८, श्लोक २५)

गीतेत अनेक श्लोकांत 'निर्वैर राहावे अर्थात् शत्रू-मित्रांत सम राहावे', अशी शिकवण दिली आहे. तेव्हा 'गीता हिंसेला प्रोत्साहन देते', हा पूर्णपणे अपसमज आहे.

## ६. गीतेत मोक्षप्राप्तीचे सांगितलेले विभिन्न मार्ग

'अर्जुनाला गीतोपदेश देणे', हे मानवाला मोक्षाचा मार्ग सांगण्याचे निमित्त होते. गीतेत युद्धाचे डावपेच, अस्त्रशस्त्रांचा कुशलतेने उपयोग इत्यादी विषयच नाहीत, तर मोक्षप्राप्तीचे विभिन्न योगमार्ग सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**६ अ. सांख्ययोग :** हा संन्यासाचा मार्ग आहे.

**६ आ. ध्यानयोग :** एकटे आणि गुप्तस्थानी राहून ध्यान लावण्यास सांगितले आहे.

**६ इ. कर्मयोग :** स्वार्थ आणि फळाची इच्छा सोडून कर्म करण्यास सांगितले आहे.

**६ ई. भक्तीयोग :** अनन्य भक्तीने ईश्वरप्राप्ती करणे हे ध्येय बनवायला सांगितले आहे.

**६ उ. विभूतीयोग :** ईश्वराचे सर्वव्यापकत्व जाणण्यास सांगितले आहे.

असे असतांना या सर्व मार्गांत हिंसा कुठे येते ? F (PR 1FG-Bh) (१ ते ६ उ)

## ७. महाभारतातील वैशिष्ट्यपूर्ण धर्मयुद्ध

अ. कौरव-पांडवांचे युद्ध हे धर्मयुद्ध होते. त्या वेळी आपापसांत चर्चा करून आधी युद्धाचे नियम ठरवले गेले होते.

आ. सूर्यास्ताला युद्ध थांबल्यावर दोन्ही पक्षातील लोक एकमेकांकडे जाऊन भेटत असत. अशा युद्धाची कल्पनाही रशिया, युरोपीय देश किंवा अमेरिका करू शकणार नाहीत.

इ. गीतेत ईश्वराच्या 'आज्ञा' नाहीत. 'फतवे' नाहीत.

### ई. निर्णय घेण्याचा अधिकार अर्जुनालाच दिलेला असणे

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ।।

– श्रीमद्भगवद्गीता, अध्याय १८, श्लोक ६३

अर्थ : अशा प्रकारे हे गोपनियाहूनही अती गोपनीय ज्ञान मी तुला सांगितले. आता तू या ज्ञानावर संपूर्णपणे विचार करून जशी तुझी इच्छा असेल, तसे कर.

स्पष्टीकरण : श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, ‘कर्तव्य-अकर्तव्य, योग्यायोग्य, आत्म्याचे स्वरूप, मोक्षप्राप्तीचे मार्ग इत्यादी सर्व ज्ञान तुला दिले. त्यावर विचार करून आता तुझी इच्छा असेल तसे कर.’ श्रीकृष्णांनी आपले मत लादले नाही. ‘अमुकच कर’ अशी आज्ञा दिली नाही. निर्णय अर्जुनावरच सोपवला.

या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होईल कि अर्धवट माहितीच्या आधारे चुकीचे निर्णय घेण्यापेक्षा गीतेचे नीट अध्ययन करून त्यातील ज्ञान आत्मसात् करणे सर्वांच्या हिताचे आहे.’

**– अनंत बाळाजी आठवले** (२१.१२.२०१३) F (PR 1FM + PR 1FG-Bh) (७ ते ७ ई)

**हिंदु धर्माची थोरवी सांगणारा सनातनचा ग्रंथ !**

**वेद (जगातील पहिले वाङ्मय !)**




- चार वेदांचे महत्त्व आणि वैशिष्ट्य कोणती ?
- संहिता, ब्राह्मणे, उपनिषदे आणि आरण्यके यांची निर्मिती का झाली ?
- धर्मग्रंथांचा अभ्यास करणे आणि त्याप्रमाणे आचरण करणे आजही का आवश्यक आहे ?
- वैदिक देवता कोणत्या? वेदांचे रक्षण आणि अध्ययन कसे करावे?

# ‘गीताज्ञानदर्शन’ – गीतेचा भावार्थ समजावून सांगणारा एक अद्वितीय ग्रंथ !’ – डॉ. आठवले

‘ती. भाऊ गीतेवर ग्रंथ लिहित आहेत, हे कळल्यावर मला प्रथम वाटले, ‘गीतेवर सहस्रो ग्रंथ असतांना आणखीन एक ग्रंथ कशाला हवा ?’ तेव्हा शाळेत असतांनाची आठवण झाली. आमच्या शाळेत गीता शिकवली जायची. ती कठीण असल्यामुळे आम्हाला कळायची नाही. त्यामुळे पुढे ‘गीता कठीण आहे’, हेच डोक्यात बसल्यामुळे मी गीता वाचली नाही. आता ती. भाऊ यांनी गीतेवर लिहिलेल्या या अप्रतिम ग्रंथामुळे गीतेचे महत्त्व कळले आणि तिच्या चरणी नतमस्तक झालो आणि हा ग्रंथ लिहिल्याबद्दल ती. भाऊंप्रती कृतज्ञता वाटली.

## १. आध्यात्मिकदृष्ट्या उन्नत असलेले ती. भाऊकाका !

२२.१२.२०१३ पर्यंत ती. भाऊंच्या आध्यात्मिक पातळीचा विचार केला नव्हता. त्यांनी लिहिलेला प्रस्तुत ग्रंथ वाचल्यावर लक्षात आले की, भाऊंची आध्यात्मिक पातळी ६४ टक्के आहे. (२७.६.२०२१ या दिवशी सनातनच्या १०१ व्या संतपदी विराजमान झाले.) भाऊंनी गीतेचा अर्थ समजून घेण्यासाठी १० वर्षे केलेले प्रयत्न ही त्यांची ज्ञानयोगानुसार साधना होती. त्यामुळे त्यांची आध्यात्मिक पातळी वाढली अन् पातळी वाढल्यामुळे ग्रंथ परिपूर्ण आणि चैतन्यमय झाला.

## २. साधनेसंदर्भात कर्तेपण नसणे

४.८.२०१३ या दिवशी दूरध्वनीवर बोलतांना ती. भाऊ म्हणाले, ‘‘तुम्ही स्वेच्छेने साधनेत आलात, तर मी नोकरीनिमित्त दोन्ही मुले दूर गेली; म्हणून साधनेत आलो.’’ ती. भाऊंचा एक मुलगा ऑस्ट्रेलियात आहे, तर दुसरा मुलगा उत्तर भारतात आहे. घरी भाऊ आणि वहिनी हे दोघेच रहातात. प्रत्यक्षात लाखो आई-वडिलांची मुले दूर असतात, तरी ते साधना करत नाहीत. याउलट ती. भाऊंनी मुले जवळ असती, तरी साधना केली असती.

## ३. ग्रंथ लिहिण्याचा अहंभाव नसणे

ग्रंथ आवडल्याचे कळवण्यासाठी मी ती. भाऊंना दूरभाष केला आणि सांगितले, ‘‘ग्रंथ इतका चांगला आहे की, दैनिक ‘सनातन प्रभात’मध्ये त्याची लेखमाला छापू आणि ग्रंथही प्रकाशित करू.’’ त्यावर भाऊ म्हणाले, ‘‘ग्रंथ तुम्हाला दिला आहे. तुम्हाला वाटेल, तसे करा. माझे काही म्हणणे नाही.’’

## ४. ती. भाऊकाकांच्या लिखाणाचे एक उदाहरण

‘कृतज्ञता’ म्हणजे काय ?

अ. ‘पदविग्रह (शब्दाची फोड) : कृतज्ञ = कृत + ज्ञ

आ. पदांचे अर्थ : ‘कृत’ म्हणजे केलेले आणि ‘ज्ञ’ म्हणजे जाणणे

इ. अर्थ : कृतज्ञता म्हणजे ‘तुम्ही माझ्यासाठी जे काही केले आहे, त्याची मला जाणीव आहे.’

## ५. श्रीकृष्णाला गुरु मानणे

भाऊ श्रीकृष्णाला गुरु मानत असल्यामुळे त्यांनी श्रीकृष्णाचा उल्लेख ‘तो’, असा न करता ‘ते’, असा केला आहे.

‘या ग्रंथाचा अभ्यासू लाभ करून घेवोत’, ही भगवान् श्रीकृष्णाच्या चरणी प्रार्थना !’

**– (परात्पर गुरु) डॉ. जयंत आठवले (ती. अनंत आठवले यांचे पाठचे बंधू), ‘सनातन संस्थे’चे संस्थापक (२२.१२.२०१३)** F (PR 1FG-Bh)

### वाचकांना विनंती

**प्रस्तुत ग्रंथात दिलेल्या ज्ञानाविषयी अभिप्राय, शंका अथवा प्रश्नोत्तरे असल्यास त्यासंबंधीच्या पत्रव्यवहारासाठी येथे संपर्क करावा –**

द्वारा, सौ. भाग्यश्री सावंत, २४–ब, सनातन आश्रम, रामनाथी, बांदिवडे, फोंडा, गोवा ४०३४०१ **ई–मेल :** sankalak.goa@gmail.com




# भगवद्गीतेतील शिकवण आचरणात आणून स्वतःतील ईश्वरत्व जागवा !

## श्रीमद्भगवद्गीता म्हणजे जीवनदर्शन आणि मोक्षदर्शन !

'श्रीमद्भगवद्गीतेमुळे 'जीवन कसे जगावे आणि कसे जगू नये', याचे ज्ञान होते. ती वाट चुकलेल्यांना मार्गदर्शन करते आणि दुःखी-कष्टी लोकांना आश्वस्त करते. गीतेच्या ठिकाणी मातेचे वात्सल्य आहे; म्हणूनच ती 'गीतामाऊली' आहे.

गीतेमधील प्रत्येक शब्दात चैतन्य सामावलेले आहे. गीता हा संन्यास, ज्ञान, कर्म, ध्यान, भक्ती इत्यादी योगमार्गांचे मार्गदर्शन करणारा धर्मग्रंथ आहे.

## युरोपीय विद्वानांनी ओळखलेले गीतेचे महत्त्व !

जगातील १९२ भाषांत गीतेचे भाषांतर झाले आहे. अनेक युरोपीय आणि अमेरिकी विद्वानांनी गीतेचे माहात्म्य मुक्तकंठाने गायिले आहे. थोरो नावाच्या पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्याला एकदा एकाने प्रश्न विचारला, ''तुमचे आचार आणि विचार एवढे चांगले कसे ?'' त्यावर तो तात्काळ उत्तरला, ''मी प्रतिदिन पहाटे उठून भगवद्गीता वाचतो.'' F (PR 1FG-V + PR 1FG-Pas + PR 1FG-Bh)

## भगवद्गीतेची शिकवणच भारतवर्षाला आणि जगालाही तारू शकेल !

गीता ही ज्ञानमय चैतन्याची शिकवण आहे. अज्ञान, रज-तम प्रवृत्ती, दुःख आणि अन्याय यांविरुद्ध लढण्याची वीरवृत्ती आहे. भगवद्गीता मानवामध्ये देवत्व निर्माण करते. आज राष्ट्र आणि धर्म यांची दुःस्थिती झाली असून भारतीय हतबल झाले आहेत. भगवद्गीतेची शिकवणच भारतवर्षाला आणि जगालाही तारू शकेल!'

**- (पू.) श्री. संदीप आळशी, रामनाथी आश्रम, गोवा. (२४.४.२०१४)** F (PR 1FG-V + PR 1FG-Pas + PR 1FG-Bh)

**'पू. संदीप आळशी यांनी अर्थपूर्ण लिखाण केले आहे. 'कसे लिहावे', त्याचे हे सुंदर उदाहरण आहे. मी त्यांचा कृतज्ञ आहे.' - अनंत आठवले**